| | |
|---|---|
| MHKO120005432016 | **नियमीत दिवाणी दावा क्र.११९/२०१६ मधील**<br>**नि. ४१ वरील आदेश**<br>सागर बाजीराव राणे<br>वि.<br>प्रमोद बाजीराव राणे |

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा दुरुस्तीसाठी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अन्वये केलेला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादीने वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केला आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जात असे कथन केले आहे की, दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीचे वर्णन म्हणून सोनारवाडी, ता.भुदरगड येथील अ.क्र.१ ते ४ या जमिनी समाविष्ट केलेल्या होत्या, परंतु दावा दाखल झाल्यानंतर शासनाच्या आदेशाने सदरच्या जमिनी सोनारवाडी गावातून राणेवाडी गावामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. त्याप्रमाणे जमिनींचे गट नंबर बदलले आहे व गावाचे नाव बदलले आहे. त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करून मिळणेकरीता परवानगी मागितली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी विरोध दर्शविला आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे जरुरीचे वाटत आहे, कारण सदर अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादींचे काही नुकसान होणार नसून उलट दावा गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे. त्यामुळे, मी पढील आदेश पारित

करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादीला नि. ४१ मध्ये मागणी केलेप्रमाणे दावा दुरुस्ती करणेकरिता परवानगी देण्यात येत आहे. वादीने मंजुर केलेली दावा दुरुस्ती आजपासून १४ दिवसांत करणेची आहे, तसेच दावा दुरुस्ती प्रत वादीने १४ दिवसांत देणेची आहे. |
| **(खुल्या न्यायालयात जाहीर )** | |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.01.16 17:06:24 +0530

**गारगोटी.**

दिनांक– १६/०१/२०२६

**(नि. दि. रुद्रभटे)**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

गारगोटी